बीड । जालना । छत्रपती संभाजीनगर → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → बुधवार दि.०१ मे २०२४ → वर्ष ९ वे → अंक -१६ → पाने ६ → किंमत २ रु
Beed / Jalna/ Chatrapati Sambhajinagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Wednesday Date: 01 May 2024 → 9 th Year → 16 th Paper → Pages : 6 → Price - 2 Rupees

महाराष्ट्राचा महानायक

बीडचा

# लोकनायक

संपादक - भारत गायकवाड

**सुट्टीची सूचना**

दिनांक १ मे रोजी कामगार दिनाची सुट्टी असल्यामुळे दिनांक २ मे रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही याची सर्व वाचक , वार्ताहर व वितरकांनी नोंद घ्यावी

-व्यवस्थापक

# बजरंग बप्पा तुम्हाला मॅनेज व्हायचं असेल तर व्हा

## परंतु मराठ्यांना मॅनेजचा धब्बा लागू देऊ नका

**भारतीय जनता पक्षाच्या विरोधात सर्वसामान्यांमध्ये बेरोजगारी व महागाई वरून चीड असणे स्वाभाविक आहे परंतु मराठा आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर असताना राज्यात अग्रणी भूमिका ही बीड जिल्ह्याने घेतली आहे अंतरवाली सराटी येथील मनोज जरांगे पाटील हे दुसरी जालना जिल्ह्यातले असले तरी देखील मराठा आरक्षणाला धार बीड जिल्ह्यामुळे मिळाली आहे त्याचाच फायदा म्हणून बजरंग सोनवणे यांना पोषक वातावरण झालेले असताना देखील मॅनेज झाल्यासारखे वागणे त्यांचे सुरू आहे फक्त बैठका व प्रचार सभा घेऊन निवडणूक जिंकता येत नाही हे माहीत असून देखील मराठ्यांच्या भावनांशी खेळण्याचा प्रकार बजरंग बप्पांनी चालवला की काय असा प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात उपस्थित होत आहे**

**लोकनायक वृत्तसेवा -** याबाबत सविस्तर वृत्त असे की भारतीय जनता पक्षाकडून पंकजा मुंडे यांचे नाव लोकसभा निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आले व शरद पवार गटाकडून बजरंग सोनवणे यांचे नाव जाहीर करण्यात आले सुरुवातीला पंकजांवर टीका देखील जोरदार झाली पंकजा आणि अहंकार कमी करावा असं देखील लिखाण अनेक वृत्तपत्रांमधून झाले परंतु परवा दिवशी मराठा समाजाने पंकजा मुंडे ची गाडी अडवल्या नंतर जो धीरोदत्त पणा त्यांनी दाखवला त्यांना मानावे लागेल दुसरीकडे बजरंग बप्पा सोनवणे यांनी फक्त टीका करण्यापुरतेच मुंडे कुटुंबीय पकडले असून मजबूत असा प्रचार अजून देखील सुरू झाल्याची चित्र पाहायला मिळत नाही (पान २ वर)

### बप्पांनी डोळ्यात अंजन घालावं म्हणजे विजय मिळेल

मराठवाड्यात अतिशय पोषक वातावरण हे बजरंग सोनवणे साठी असून देखील त्याचा पुरेसा फायदा त्यांना घेता येत नसल्याचे चित्र जिल्ह्यामध्ये सध्या तरी आहे खासदार होण्याआधीच बजरंग सोन-वणे यांचे पी ए विजय अंजन तोऱ्यात असल्याचे पाहायला मिळत आहे तर बजरंग सोनवणे यांच्याशी बातचीत करणारे की आजच मुश्किल झाले बोलले जात आहे




## गंमत भाऊं(मुळे) अण्णा झाले साहेब

जीवनात एखादा गॉडफादर असायला लागतो ज्याच्यामुळे आपल्याला शक्ती मिळते जो आपल्या कुठल्याही प्रसंगात अडीअडचणीत स्वतःच्या अनुभवाचा योग्य मार्गदर्शन करतो प्रत्येक व्यक्तीला आयुष्यात जोपर्यंत आपला गॉडफादर मिळत नाही तोपर्यंत जीवन हे भरकटल्यासारखे वाटते,२००२ साली अंगावरच्या कपड्यांनिशी बीडमध्ये आलेल्या मुळे अण्णा म्हणजेच विश्वंभर मुळे यांची परिस्थिती अत्यंत हालाखीची हे सांगण्याची गरज नाही कारण कपड्यांनिशी एखाद्या शहरात आलेल्या माणसाची परिस्थिती कशी असते हे सर्वज्ञात आहे.

वयाच्या १८ व्या वर्षी तरुण भारत, सामना, सांजवार्ता, मराठवाडा अजिंठा, गावकरी, औरंगाबाद सिटीझन इत्यादी दैनिकांमध्ये २००२ पर्यंत पेपरचे गठ्ठे उचलण्यापासून ते पेपरच्या टॅक्सीच्या कॉन्ट्रॅक्ट पर्यंतचा प्रवास होता, शिक्षण जेमतेम परंतु फक्त मेहनतीच्या जोरावर मुळे अण्णांनी औरंगाबाद मध्ये तीन घरं घेतली ज्या ९० च्या दशकामध्ये लोकांना सायकल देखील महाग होती त्या काळात पद्मिनी मध्ये नॉन मॅट्रिक म्हणून फिरत होता परंतु आर्थिक गणित चुकली व त्यामुळे औरंगाबाद सोडून बीडमध्ये कपड्यानिशी यायला लागले सासरे पी एल कुलकर्णी पंचायत समिती बीड येथे असल्याने त्यांच्या आधाराने बीडमध्ये आले २००२ साली महिंद्रा ऑटोमोबाईल येथे नोकराचे काम केले परंतु पेपर मध्ये काम करण्याची सुप्त इच्छा असल्याने मन लागत नव्हते. जगदीश काळे यांचे बंधू बापू काळे यांनी गंमत भंडारी यांच्याकडे शिफारस केली गंमत भाऊंनी सुरुवातीला म्हणजेच २००२साली दुपारी १२ ते रात्री १२ अशी बारा तासाची ड्युटी बाराशे रुपये महिन्यावर दिली. रात्री बाराला ड्युटी संपल्यानंतर हा माणूस घरी जात नव्हता बशीरगंज येथील ए. वन. टेलर्स येथे चार-पाच तास शिलाई मशीनवर देखील काम करत होता. गंमतभाऊ सारख्या माणसाकडे वीस वर्ष काम करणे म्हणजे रोज डोंबाऱ्याचा खेळ होता. परंतु दोन लेकर बायको असा परिवार सांभाळण्यासाठी या माणसाने रोज या गोष्टी आनंदाने आणि अतिशय हिरीरीने पार पाडल्या. ज्याचा मोबदला आता बऱ्यापैकी दिसत असून एक मुलगा इंजिनियर आहे दुसरा मुलगा एडवोकेट आहे पत्नी देखील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात वाहक म्हणून कार्यरत आहे गंमत भाऊंकडे रक्ताचं पाणी करणाऱ्या या माणसाला त्या वीस वर्षाचे चीज झाल्यासारखं वाटतं कारण २००२ मध्ये महिनाभर बिना चपलाच फिरणारा माणूस आज जिल्ह्यातील कुठल्याही नेत्यांच्या बैठकीत नावानिशी ओळखल्या जातो. दांडगा जनसंपर्क पार्श्वभूमीत केलेल्या कामामुळे तयार झाला. या सगळ्या प्रवासाला गंमत भाऊंचे मार्गदर्शन व खंबीर साथ होती हे आज देखील हा माणूस त्यांच्या अपरोक्ष मान्य करतो, मुळे अण्णा हे गंमत भाऊं मुळे साहेब झाले यात शंका नाही.

**विश्वम्भर मुळे (अण्णा) यांना वाढदिवसाच्या लक्ष लक्ष शुभेक्षा !**

**अक्षय मुळे**
**कार्यकारी संपादक**
**९४०५०७१११८**

## अंबडमध्ये गॅसच्या स्फोटात विवाहितेचा मृत्यू

**अंबड लोकनायक वृत्तसेवा -** अंबड शहरातील शारदा नगर भागातील घरात स्वयंपाक करताना गॅस संपल्याने सिलिंडर बदलत असताना अचानक सिलिंडरचा स्फोट झाल्याने २८ वर्षीय विवाहितेचा मृत्यू झाला. दि.२९ एप्रिल रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास ही दुर्घटना घडली. पूजा पवनमते, असे मृत विवाहितेचा नाव आहे. पवन मते हे अंबड येथील



शारदानगर भागात कुटुंबीयांसह राहातात. आज सायंकाळी पवन हे बाहेर गेलेले होते. तर त्यांची (पान २ वर)




## १ मे महाराष्ट्र दिन पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

**लोकनायक वृत्तसेवा -** महाराष्ट्र दिनाच्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त बुधवार दि. १ मे २०२४ रोजी बीड येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सकाळी ८ वाजता कृषी मंत्री तथा पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांच्या शुभहस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ होणार आहे. याच बरोबर जिल्ह्यात विविध ठिकाणी ध्वजारोहण केले



जाणार असून, जिल्हाधिकारी कार्यालयातील ध्वजारोहण जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते १ मे रोजी सकाळी ७.१५ वाजता होणार आहे. तसेच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील ध्वजारोहणाचा कार्यक्रम अप्पर जिल्हाधिकारी, बीड, त्रिगुण कुलकर्णी यांच्या हस्ते सकाळी ७.०० वाजता संपन्न होणार असून दोन्हीही ध्वजारोहण समारंभ संपल्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हा पो-लीस मुख्यालय मैदान, बीड येथील (पान २ वर)



लोकनायक
बुधवार दि.०१ मे २०२४


# विकासाचा कणा आसणाऱ्या कामगारांचा आंतरराष्ट्रीय कामगार दिन




१ मे या दिवसाला महाराष्ट्रात खूप महत्त्व आहे कारण या दिवशी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. मात्र एवढंच नाही १ मेला आंतरराष्ट्रीय महत्त्वदेखील आहे. कारण जगभरात हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. अठराव्या शतकात झालेल्या एका कामगार चळवळीच्या गौरवासाठी आजही जगभरात साजरा करण्यात येणारा हा एक खास दिवस आहे. भारतात कामगार दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. विशेष म्हणजे जगभरात अनेक देशांमध्ये हा दिन निरनिराळ्या पद्धतीने साजरा केला जातो.यासाठीच जाणून घ्या १ मेला महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन का साजरा केला जातो. कामगार दिन साजरा करण्याची सुरुवात कामगारांच्या हितानिमित्त झालेल्या एका चळवळीतून झाली. १९ व्या शतकाच्या मध्यावर कामगारांच्या एका तीव्र चळवळीला सुरूवात झाली. ज्यात कामगारांच्या हितासाठी काही मागण्या करण्यात आल्या होत्या. पहिली मागणी २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांनी केली होती. दिवसाचे कामाचे तास ठराविक असावेत यासंदर्भात ही मागणी होती. ऑस्ट्रेलिया पाठोपाठ पुढे मग अमेरिका, कॅनडामधील कामगार संघटनांनी पुढाकार घेत १९८६ मध्ये कामगारांच्या हितासाठी मोर्चे काढण्यास सुरुवात केली. अशाच एका मोर्च्यामध्ये शिकागो मधील सहा आंदोलकांचा मृत्यू झाला. ज्याबद्दल कामगारांनी तीव्र निषेध व्यक्त केला. पोलिसांवर राग व्यक्त करण्यासाठी एका अज्ञात व्यक्तीने बॉम्ब टाकला आणि त्यात आठ पोलिसांचा मृत्यू आणि पन्नास पोलीस जखमी झाले होते. याची शिक्षा म्हणून आठ आंदोलनकर्त्यांना फाशी देण्यात आली होती. मात्र त्यामुळे जगभरात संतापाची लाट पसरली कारण त्या आठ जणांपैकी एकानेही बॉम्ब फेकलेला नव्हता. या रक्तरंजित इतिहासानंतर या आंदोलनाला एक भव्य दिव्य स्वरूप प्राप्त झाले. १९९० ला कामगारांची ही चळवळ यशस्वी झाली. शिकागोमधील या घटनेचे स्मरण करण्यासाठी रेमंड लेविन यांनी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी केली. त्यांनी ही मागणी १९८९ साली आयोजित दुसऱ्या आंतरराष्ट्रीय पॅरीस परिषदेत केली होती. त्या परिषदेमध्ये १ मे १८९० हा दिवस जागतिक एकता दिवस म्हणून साजरा करण्याचे निश्चित करण्यात आले. पुढे १८९१ च्या दुसऱ्या परिषदेत या कार्यक्रमाला औपचारिक मान्यता देण्यात आली. ज्यामुळे आज जगभरात १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे महत्त्व - १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा का केला जातो ?

१)हा दिवस कामगारांच्या हितानिमित्त केल्या गेलेल्या त्या चळवळीचे प्रतिक आहे. ज्यामध्ये कामगारांनी दिवसाचे कामाचे तास आठ असावेत अशी प्रमुख मागणी केली होती. कारण त्यापूर्वी कामगारांना दिवसभरात पंधरापेक्षा जास्त तास काम करावे लागत असे. पुढे लोक या चळवळीला आठ तासांची चळवळ म्हणूनही ओळखू लागले.२)या चळवळीत कामगारांच्या कामाच्या तासांसोबतच त्यांना कामाच्या बदल्यात मिळण्याऱ्या वागणूक आणि मोबदल्या विषयीही प्रमुख मागण्या करण्यात आलेल्या होत्या. शिकागो आंदोलनानंतर कामगारांना आठ तासांचे काम, योग्य मोबदला, चांगली वागणूक, पगारी सुट्टी मिळू लागली. ३)निरनिराळ्या समाजवादी, साम्यवादी आणि अराजकवादी गटांनी केलेल्या निर्दशनासाठी १ मे हा दिवस ओळखला जातो.४)युरोपमध्ये पूर्वीपासून १ मे हा दिवस वसंत उत्सव म्हणूनही साजरा केला जात असे. पुढे या आंदोलनामुळे युरोपमध्ये ही हा दिवस कामगार दिन म्हणून साजरा होऊ लागला.५)१९०४ साली ॲम्स्टरडॅम येथे झालेल्या दुसऱ्या जागतिक परिषदेत संपूर्ण जगभरातील कामगार संघटनांना १ मे हा दिवस कामगार दिन म्हणून साजरा करावा असं आवाहन करण्यात आलं होतं.६) आजही अनेक प्रमुख देशांमध्ये १ मे निमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर केली जाते. त्याचप्रमाणे या दिवसानिमित्त अनेक देशांमध्ये खास कार्यक्रम आणि सैन्याचे संचलन आयोजित केले जाते. भारतात लेबर किसान पार्टीने १ मे १९२३ साली पहिल्यांदा कामगार दिन साजरा केला होता. त्यावेळी भारतात कामगारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी लाल रंगाचा झेंडा वापरण्यात आला होता.७)भारतात १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन आणि महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली म्हणून महाराष्ट्र दिन म्हणूनही साजरा केला जातो. ८)१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली म्हणून 'महाराष्ट्र दिन' साजरा करण्यात येतो. तर १ मे रोजीच' जागतिक कामगार दिन' सुद्धा पाळण्यात येतो. दरवर्षी आंतरराष्ट्रीय कामगार दिन किंवा जागतिक कामगार दिन हा जगभरातील कामगार चळवळींच्या गौरवासाठी पाळण्यात येणारा दिन आहे. १ मे महाराष्ट्र दिन मराठी माहिती प्रत्येक वर्षी १ मे रोजी जगभरातील अनेक देशांमध्ये हा दिवस राष्ट्रीय सुटीचा दिवस म्हणून पाळला जातो. कामगार दिन कस सुरु झाला ? औद्योगिक क्रांती झाल्यानंतरकामगारांना रोजगार मिळू लागला परंतु त्यांची पिळवणूकही होत होती. कोणत्याही सुविधा न देता अल्प मजुरीच्या बदल्यास १२ ते १४ तास राबवून घेतले जात होते. याविरोधात कामगार एकत्र आले व कामगार संघटनांनी निर्मिती झाली. प्रत्येक कामगाराला केवळ ८ तास काम असावे, असा ठराव घेतला. परंतु उद्योजक जुमानत नसल्याने मोठे आंदोलन उभारण्यात आले. त्यानंतर कामगार संघटनांची दोन आंतरराष्ट्रीय अधिवेशने झाली आणि त्यानंतर १८९१ पासून ' १ में' हा कामगारदिन पाळण्यास सुरुवात झाली. काय होत्या कामगारांच्या मागण्या ? कायद्याने दिल्या पाहिजेत * ८ तासांचा दिवस * लहान मुलांना कामाला लावण्यावर बंदी * महिला कामगारांच्या कामावर मर्यादा * रात्रीचे काम व धोक्याचे काम यासाठी खास नियम * कायद्याने साप्ताहिक सुट्टी * कामाचा मोबदला वस्तुच्या रुपात न देत कामगारांना रोजगार मिळू लागला परंतु त्यांची पिळवणूकही होत होती. कोणत्याही सुविधा न देता अल्प मजुरीच्या बदल्यास १२ ते १४ तास राबवून घेतले जात होते. याविरोधात कामगार एकत्र आले व कामगार संघटनांनी निर्मिती झाली. प्रत्येक कामगाराला केवळ ८ तास काम असावे, असा ठराव घेतला. परंतु उद्योजक जुमानत नसल्याने मोठे आंदोलन उभारण्यात आले. त्यानंतर कामगार संघटनांची दोन आंतरराष्ट्रीय अधिवेशने झाली आणि त्यानंतर १८९१ पासून ' १ में' हा कामगारदिन पाळण्यास सुरुवात झाली. आठ तास काम, आठ तास आराम व आठ तास मुक्त जगण्यासाठी', असे गीतही तयार करण्यात आले होते भारतातील पहिला कामगार दिन भारतातील पहिला कामगार दिन तत्कालीन मद्रास शहरात १ मे १९२३ रोजी पाळण्यात आला. लेबर किसान पार्टी हिंदुस्थान या संघटनेने हा दिवस पाळला होता. याच दिवशी भारतात सर्व प्रमथ लाल बावटा वापरण्यात आला. कामगार नेते सिंगरवेलू चेत्तीअर यांनी कामगार दिन कार्यक्रमाच्या आयोजनात पुढाकार घेतला होता. मद्रास उच्च न्यायालयासमोरील जागेत हा दिवस साजरा झाला होता. आंतरराष्ट्रीय कामगार दिन देशाच्या पर्यायाने जगाच्या विकासात कामगारांच्या योगदानाला सलाम करण्यासाठी १ मे हा दिवस जगभरात कामगारदिन म्हणून पाळला जातो. या दिवशी जगातील अनेक देशांमध्ये सार्वजनिक सुटी जाहीर करण्यात येते. कामगार दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. कामगार संघटना तसेच उद्योजक व सरकारतर्फे उत्कृष्ट कार्य करणा-या कामगारांचा गौरव करण्यात येतो.आशा प्रकारे १ मे हा दिवस कामगार दिन म्हणुन साजरा केला जातो.



**लेखिका**
**सौ. भारती रंगनाथ भगत.**
**शिक्षिका**
**लोयोला हायस्कूल, पाषाण रोड, पुणे ०८**
**९७६६१६७६३२**

## पान १ वरुन

**बजरंग बप्पा...**

खरंतर भारतीय जनता पक्षाच्या विरोधात सर्वसामान्यांमध्ये थोड्या अधिक प्रमाणात अतिशय रोष आहे तसेच मराठा आरक्षणाचा प्रश्न देखील ऐरणीवर आहे तरीही देखील बजरंग सोनवणे यांना फारसा दिल्लीत जाण्यास रस नसल्याचे चित्र आहे

**अंबडमध्ये गॅसच्या...**

लहाने मुलगा भावेश (वय ४) व खुशी (वय २) हे दोघे बाहेर खेळत होते. पूजा या घरात स्वयंपाक करत असताना गॅस संपला. त्यामुळे त्या स्वयंपाक घराच्या बाहेर ठेवलेले सिलिंडर घेऊन येत होत्या. मात्र, अचानक भरलेल्या सिलिंडरचा स्फोट झाल्याने त्या गंभीर भाजल्या. मोठा आवाज झाल्याने शेजारी असल्याने घराकडे धावले. घरातील साहित्याने पेट घेतल्याने अग्निशमन दलास पाचारण करण्यात आले यावेळी आग आटोक्यात आणण्यात आली तसेच अग्निशमनदलाचे श्री सांगळे यांनी घरामधील पेट घातलेली गॅस टाकीवर मोठ्या प्रमाणात कपडे गोधड्या गादी टाकण्यात आल्याने संपूर्ण परिसरातील मोठा स्फोट होण्यास टाळला गेला.दरम्यान, जखमी पूजा यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. राऊत यांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. दरम्यान, १८ एप्रिल रोजीच पवन व पूजा यांनी कुटुंबियांसोबत आपल्या लग्नाचा वाढदिवस साजरा केला होता. अचानक झालेल्या या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात सदर घडलेल्या घटनेची नोंद करण्यात आली आहे

**१ मे महाराष्ट्र दिन...**

ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभास सकाळी ७.४५ पूर्वी शासकीय गणवेषात उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परिपत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

## पान ६ वरुन

**आदर्श आचारसंहितेचा ...**

अशा मौलिक सूचना श्री हक यांनी यावेळी दिल्या.

**पालकमंत्र्यांना बहिणीला...**

त्यात ते स्वतःचा नाकर्तेपणा देखील अधोरेखित करत आहेत हेच काय कमी होते कि काय त्यात त्यांनी कालच्या सरपंचाच्या बाबतीत वक्तव्य करून बहिणीच्या अडचणी वाढवण्याचेच काम करत आहेत त्यामुळे त्यांना आपल्या बहिणीला पडण्याची घाई झाली आहे कि काय असे वाटू लागले आहे . त्यांचा पराभव हि जनता करणारच आहे त्यासाठी चार जूनची वाट तरी बघा असा टोमणा देखील मारला आहे

**हातभटी दारू...**

पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड, पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे सफौ/तुळशिराम जगताप, पोह/चव्हाण,विकास राठोड, बाळु सानप, चालक उलगे यांनी केली आहे. या कारवाईमुळे अवैध दारू विक्री करणाऱ्यांमध्ये दहशत निर्माण झाली आहे आणि शहरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

**बजरंग बप्पा ...**

बोलताना वरेकर म्हणाले की, मोदी व शहा हे इंग्रजासारखे अन्याय व अत्याचार करत आहेत, लहान, लहान पक्ष त्यांना संपवून टाकायचे आहेत,सत्याचा आवाज दडपण्याचा प्रयत्न करत आहेत, बीड जिल्ह्यातही मुंढेशाही मनमानी राज करित आहेत बीडच्या विद्यमान खासदारांने ८० कोटींचा निधी परत लावला आहे तरीही पुन्हा आम्हालाच निवडून द्यावे असे मुंढे बंधू भगिनी बोलत आहेत आता,आपण यांना वेळीच ओळखून बजरंग बप्पा यांनाच मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी केले.यावेळी पंचक्रोशीतील हजारो लोक व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विकासाच्या नावाखाली...**

व बदनापूर शहराची प्रचार सभा सोमठाना येथे आयोजित करण्यात आली होती.यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.याप्रसंगी जालना जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर,राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट)जिल्हाध्यक्ष डॉ.निसार देशमुख,मा.आ.संतोष सांबरे, राजेंद्र राख, माजी नगराध्यक्ष बबलू चौधरी,जयप्रकाश चव्हाण, बाबूराव पवार,भानुदासराव घुगे, बाबासाहेब डांगे,दीपक डोंगरे,भास्कर मगरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलतांना डॉ.कल्याण काळे म्हणाले की,केंद्रातील भाजपा सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे महाराष्ट्रासह देशातील शेतकरी पुरता हवालदिल झाला आहे.शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव देण्याचे आश्वासन दहा वर्ष सत्ता असतांना पाळले नाही.अत्यंत कमी भाव मिळत असल्याने मागील दोन वर्षापासून आपला कापूस आणि सोयाबीन शेतकऱ्यांनी घरात ठेवले आहे.भांडवलदार आणि उद्योगपतींचे लाड पुरविणाऱ्या या सरकारने कामगार विरोधी कायदे अमलात आणून देशातील लाखो कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना उपाशी मारण्याचे काम केले असून नौकऱ्या,कामधंदे नसल्याने लाखो सुशिक्षित तरुण बेरोजगारीचा सामना करत असल्याचे आपण नेहमीच बघतो आहोत.महागाईने कळस गाठला असल्याने सर्वसामान्य जनता घरगाडा सांभाळताना अक्षरशः वैतागून गेल्याचे चित्र मन सुन्न करणारे असून केंद्रातील भाजपा सरकारच्या विरोधात देशात तीव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे.महाविकास आघाडीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी गावागावात प्रत्येक घरापर्यंत पोहचवून केंद्रातील भाजपा सरकारला खाली खेचण्यासाठी मतदारांशी संपर्क साधून महाविकास आघाडीच्या विजयासाठी प्रयत्न करावा असे आवाहन उमेदवार डॉ.कल्याण काळे यांनी केले आहे.तत्पूर्वी राजाभाऊ देशमुख,भास्करराव अंबेकर,डॉ.निसार देशमुख,माजी आ.संतोष सांबरे,बबलू चौधरी आदी मान्यवरांनी आपल्या भाषणातून केंद्र आणि राज्यातील सरकारच्या कारभारावर टीका करून महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे यांना मोठया मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन उपस्थितांना केले.सभेपूर्वी उमेदवार डॉ.कल्याण काळे आणि अन्य मान्यवरांनी बदनापूर तालुक्याचं दैवत सोमठाणा येथील माता रेणुका देवीची मनोभावे पूजा करून दर्शन घेतले.देवीच्या दर्शनाने मन प्रफुल्लित होऊन पुढील कार्यास ऊर्जा मिळाली अशी प्रतिक्रिया डॉ.कल्याण काळे यांनी व्यक्त केली.या कार्यक्रमास ठोंबरे,राम शिरसाठ,रमेश शिंदे,कैलास चव्हाण,विजय जऱ्हाड,भगवान कदम,लक्ष्मण म्हसलेकर,बाबासाहेब डांगे,अंकुश शिंदे, चितळकर,राजेंद्र जैस्वाल,शेळके,श्रीराम कान्हेरे, राजेंद्र शिनगारे,देहूजी जऱ्हाड, रामकीसन मेंढरे,अरुण पैठणे, शिवाजी कऱ्हाड,संभाजी शेळके, परमेश्वर गोते,भारत मदन,भास्कर शिंदे,पद्माकर पडुळ,संतोष नागे यांच्यासह बदनापूर शहर आणि रोषणगाव,बाजार गेवराई,सेलगाव आणि परिसरातील शेतकरी,कामगार,ग्रामस्थ पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**रोटरी क्लब...**

अध्यक्ष व सचिव यांचे प्रशिक्षण शिबीर लातूर येथे नुकतेच संपन्न झाले असून शिबिरामध्ये या वर्षात नवनवीन विविध उपक्रम राबवण्याचा संकल्प नवनियुक्त अध्यक्ष व सचिव यांनी केला आहे. रोटरी इंटरनॅशनल हि आंतरराष्ट्रीय स्तरावर समाज उपयोगी विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात अग्रेसर असणारी संस्था असून या अंतर्गत माजलगाव सिटी क्लब च्या माध्यमातून आजपर्यंत विविध समाज उपयोगी उपक्रम राबवण्यात आलेले आहेत. ड.रविंद्र कानडे हे श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे कार्यकारी संचालक असून संस्थेच्या माध्यमातून सामाजिक व सांस्कृतिक कार्यात त्यांनी नेहमीच सातत्याने सहभाग नोंदवलेला आहे रोटरी क्लब च्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात माजलगाव सिटी मध्ये रोटरी क्लब च्या माध्यमातून विविध उपक्रम राबवण्याचा मानस त्यांचा आहे. त्यांच्या निवडीबद्दल रोटरी क्लब चे सर्व सदस्य, पूर्व अध्यक्ष व समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

**जालना लोकसभेसाठी...**

काळे, (हात), रावसाहेब दादाराव दानवे (कमळ), निवृत्ती विश्वनाथ बनसोडे (हत्ती), दिपक भीमराव बोऱ्हाडे (रोड रोलर), धनंजय रुपरावजी काकडे (पाटील) (गिफ्ट पॅक), बकाले प्रभाकर देवगण (गॅस सिलेंडर), बाबासाहेब संतुकराव शेळके (बॅटरी टॉर्च), भगवान साहेबराव रेगुडे (शिट्टी), मुकेश प्रभात राठोड (जहाज), श्याम रुस्तुमराव शिरसाठ (ऊस उत्पादक शेतकरी), अजहर अन्वर सय्यद (ट्रम्पेट), अब्दुल रफिक अब्दुल लतीफ (पाण्याची टाकी), अहमद रहीम सैख बागवान (ऑटो रिक्षा), कडूबा म्हातरबा (केटली), कांबळे मारोती दशरथ (प्रेशर कुकर), चाबुकस्वार राहुल निरंजन (नागरिक), तानाजी तुकाराम भोजने (रिंग), बाबासाहेब पाटील शिंदे (अलमिरा), मनोज नेमिनाथ कोलते (गॅस स्टोव्ह), मंगेश संजय साबळे (स्पॅनर), ड. योगेश दत्तू गुल्लापेल्ली (बॅट), रतन आसाराम लांडगे (प्लास्टरिंग ट्रॉवेल), राजेंद्र नामदेव मगरे (हिरा), विकास छगन लहाने (एअर कंडिशनर), शाम पावलस रुपेकर (बासरी), ज्ञानेश्वर दगडुजी नाडे (शिवणकामाचे यंत्र) अशी चिन्हे वाटप करण्यात आले आहे. जालना जिल्ह्यातील घनसावंगी, परतूर येथील भाग परभणी लोकसभा मतदार संघात समाविष्ट आहे.तेथील निवडणूक २६ एप्रील रोजी पार पडली असून मागच्या पंचवार्षीक निवडणुकीत जेव्हढे मतदान झाले होते तेवढेच मतदान यावेळेस सुध्दा या भागातून झाल्याची माहिती पांचाळ यांनी दिली.

मुळे गुरुजी अँन्ड असोसिएटस
9405071118

बीडचा
महाराष्ट्राचा महानायक
# लोकनायक
३
बुधवार दि.०१ मे २०२४
पुणे/अ.नगर जिल्हा

महाराष्ट्राचा महानायक दैनिक लोकनायक या वृत्तपत्राची पुणे/अ.नगर आवृत्ती दिनांक १ एप्रिल २०२४ पासुन नियमित प्रकाशित होणार असुन याची सर्व प्रतिनिधी यांनी नोंद घ्यावी हि नम्र विनंती.



रिझवान बागवान
पुणे जिल्हा प्रतिनिधी

# नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांचे 3 मे रोजी पोलिस अधिक्षक कार्यालयासमोर उपोषण

लोकनायक वृत्तसेवा मन्सुर पठाण - नगर-अर्बन बँकेच्या ठेवीदारांना ठेवीची रक्कम परत मिळावी तसेच बँकेवर दरोडा घालणार्या दोषी संचालक आणि कर्जदारांच्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई होण्यासाठी जिल्हा प्रशासन व पोलिसांवर दबाव वाढविण्याच्या दृष्टीने शुक्रवारी ३ मे रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वा. पर्यंत जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषणास बसण्याचा निर्णय बँक बचाव संघर्ष कृती समितीने घेतला असल्याची माहिती समितीचे डी.एम. कुलकर्णी यांनी दिली आहे. या संदर्भात माहिती देताना कुलकर्णी यांनी म्हटले आहे की, नगर अर्बन बँकेचा नियोजनपूर्वक खून झाल्यानंतर बँक वाचविण्यासाठी बँक बचाव संघर्ष समितीने सातत्याने प्रयत्न केले आहेत. ठेवीदारांच्या बँकेत अडकलेल्या ठेवी परत मिळण्यासाठी समितीने कायदेशीर मार्गाने लढा दिला आहे. याच तळमळीतून २ मार्च रोजी रास्ता रोको आंदोलन केले.पोलिस व प्रशासना बरोबरच सातत्याने चर्चा




केल्या. ठेवीदारांच्या व्यथा पोटतिडकीने शासनस्तरावर मांडल्या. या लढ्यासाठी वारंवार आवाहन करूनही मोजकेच ठेवीदार प्रत्येक वेळी उपस्थित राहत असल्याबाबत खंत वाटत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. बँक बचाव समिती ठेवीदारांच्या हक्काचा पैसा परत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशिल आहे. सदर पैसे आजारपण, अडचणीच्या वेळी ठेवीदारांना उपलब्ध व्हावा यासाठी समितीची तळमळ आहे. बँक लुटणार्यांना शिक्षा झालीच पाहिजे. यासाठी पोलिस दलावर दबाव ठेवण्याचा प्रयत्न चालू आहे. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून शुक्रवारी (दि.३ मे) रोजी जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे. ठेवीदारांनी आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन श्री. कुलकर्णी यांनी केले आहे.

## ऐतिहासिक खर्डा येथील भुमीपुत्रांची ऐतिहासिक कोरेगाव भीमा विजय रणस्तंभास भेट

रिजवान बागवान पुणे जिल्हा प्रतिनिधी- अहमदनगर जिल्ह्यातील ऐतिहासिक खर्डा (शिवपठ्ठण) येथील भुमीपुत्रांनी कोरेगाव भीमा येथील ऐतिहासिक विजय रणस्तंभास भेट देऊन अभिवादन केले.

याप्रसंगी खर्डा (शिवपठ्ठण) येथील सामाजिक कार्यकर्ते शाम (महाराज) सकट,बाळासाहेब सकट,युवा पत्रकार संघाचे पुणे जिल्हाध्यक्ष पत्रकार रिजवान बागवान,बंटी सकट,अक्षय (बाबु) सकट आदि उपस्थित होते. यावेळी युवा पत्रकार संघाच्या वतीने पुणे जिल्हाध्यक्ष पत्रकार रिजवान बागवान यांनी ऐतिहासिक खर्डा येथील भुमीपुत्रांचे हार्दिक स्वागत केले.



## नगरकर म्हणतात नगर झाले दहशत नगर

लोकनायक वृत्तसेवा मन्सुर पठाण - नगर शहरात गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.दिवसाढवळ्या गोळीबार म्हणा किंवा महिलांवरील अत्याचार म्हणा रोज काही ना काही गुन्हेगारी घटना समोर येत आहे. नगरची सामान्य जनता भयभीत होऊन सवाल उपस्थित करतात की नगर हे दहशत नगर झाले आहे. अशीच एक घटना समोर आली आहे,ऑईल टाकून दुकान पेटवून दिल्याची घटना शहरातील कोठी चौकात घडली. १० रुपयांची फाटकी नोट घेण्यास नकार दिल्याने राग येवून हे कृत्य केले असल्याची माहिती मिळाली आहे. दुकान पेटवून नुकसान करणाऱ्या या आरोपीला पोलिसांनी सोमवारी (दि.२९) रात्री अटक केली आहे.विजय दिलीप झेंडे (वय २६, रा. सात खोल्या, नगर कॉलेजजवळ, अहमदनगर) असे या आरोपीचे नाव असून याबाबत रंजना अजय बसापुरे यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की फिर्यादी बसापुरे यांचे कोठी चौकातील पाटील हॉस्पिटल समोर महावीर दुध डेअरी व जनरल स्टोअर या नावाचे दुकान आहे. रविवारी (दि.२८) बसापुरे या दुकानात असताना आरोपी विजय झेंडे दुकानात आला.त्याने वस्तू खरेदीसाठी १० रुपयांची फाटकी नोट दिली. ती घेण्यास बसापुरे यांनी नकार दिला. त्याचा राग येवून आरोपी झेंडे याने रात्री १० च्या सुमारास ऑईल घेवून येत ते दुकानात ओतत दुकानात आग लावली.या आगीत दुकानातील लाकडी काऊंटर, लहान मोठ्या बरण्या व इतर साहित्य असे २० हजारांचे साहित्य जळून नुकसान झाले असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी विजय झेंडे याच्या विरुद्ध भा.दं. वि.कलम ४३६, ५०४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.सोमवारी (दि.२९) सायंकाळी गुन्हा दाखल झाल्यावर पोलिसांनी रात्री उशिरा आरोपीला अटक केली आहे. दरम्यान नगर शहरात अनेक गुन्हेगारी घटना वारंवार समोर येताना दिसत आहेत. मारामारी, चोरी, खून आदी गुन्हेगारी शहरात घडत आहेत. त्यामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण आहे

## जामखेड ते सौताडा रस्त्याचे काम कधी होणार ? आणखी किती माणसांचे बळी हवेत !

जामखेड तालुका प्रतिनिधी अजय अवसरे - जामखेड शहर आणि परिसरात पंधरा दिवसात १५ अपघात होण्याच्या घटना घडल्या आहेत. यामध्ये वीस गंभीर तर सात किरकोळ जखमी झाले आहेत. मंगळवारी (ता. ३०) रात्री साडेबारा सुमारास रस्त्यालगत मातीचा ढिगारा आणि मोठे खड्डे लक्षात न आल्याने मोटरसायकलचा अपघात होवून दोन जण जखमी १५ फूट लांब उडून खाली पडल्याने डोक्याला मार लागून,गंभीर जखमी झाले. याबाबत घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना किरण रेडे यांनी मोबाईल वरून सांगितली. कोठारी हे आपले मित्र आकाश



घागरे यांना घेऊन सुराणा पेट्रोल पंपाच्या समोर घटनास्थळी पाच मिनिटात दाखल झाले. तेव्हा दोघेजण रक्ताच्या थारोळ्यात पडलेले होते. सचिन बाबासाहेब मस्के (वय २२) (राहणार राडी तालुका आंबेजोगाई जिल्हा बीड ),अनिकेत रावण साळवे (वर २५) ( राहणार पुणे) हे दोघे पुण्यावरून आंबेजोगाईला जयंती साठी मोटरसायकलवर ( क्रमांक एम. एच. १४ जे. व्हि. २५९८) सायंकाळी साडेपाच वाजता निघाले होते. जामखेड शहरालगत रस्त्याचे काम चालु असल्याने ,त्यातच या कामावर दिशादर्शक फलक नसल्याने लक्षात न येण्यासारखे मोठमोठे खडीचे ढिगारे आणि चढउतार असल्याने जोरात उडून पडल्याने जखमी झाले. कोठारी यांनी जखमींना आपल्या रुग्णवाहिकेत ताबडतोब दवाखान्यात दाखल केले. यावेळी आप्पा देवकाते ,रवी अंधारे, बाळू समुद्रे,अविनाश शिरसागर यांनी मदत केली यावेळी बोलताना सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी म्हणाले, रस्त्याचे काम अत्यंत धिम्या गतीने सूरू असल्याने रोज किमान २-३ अपघात होत आहेत. त्यामध्ये मोटारसायकल अपघाताचे प्रमाण खूप मोठे आहे.याप्रश्री तातडीने काम होणेबाबत कार्यवाही होणे गरजेचे आहे. दरम्यान संजय कोठारी यांनी या महामार्गाचे उपअभियंता दिलीप तारडे यांच्या ही बाब निदर्शनास आणून दिली. रस्ता वाहतूकीला सुरक्षित करतानाच ठिकठिकाणी दिशादर्शक फलक बसवण्याची मागणी त्यांनी केली.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींची तिसऱ्या पर्वाकडे दमदार वाटचाल सुरू - सुजय विखे पाटील

जामखेड तालुका प्रतिनिधी अजय अवसरे - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतमातेची सेवा करण्याचे दायित्व खांद्यावर घेतले आहे.आपली भारतामाता मोदींच्या भक्तीयोगातून, कर्मयोगातून, आणि ज्ञानयोगातून पुन्हा एकदा विश्वरूपदावर आरूढ झाल्या शिवाय राहणार नाही असा आत्मविश्वास महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी केला आहे. यामुळे तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी कामाला लागा असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. ते जामखेड येथील महायुतीच्या प्रचार सभेत बोलत होते. अहिल्यानगर लोकसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात असून डॉ. सुजय विखे यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आपण केलेल्या विकास कामे घेऊन ते मतदारांसमोर जात आहेत.



जामखेड मधील मुंगेवाडी येथे मंगळवारी महायुतीच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार राम शिंदे, रवी सुरवसे, बाळासाहेब भोसले, योगेश सुरवसे, राजू भोसले, अण्णा सुरवसे, हरीदास गोपाळघरे, यासह स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी डॉ. विखे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींचे व्यक्तिमत्व, कार्यशैली निर्णयक्षमता, दूरदृष्टी,विकासाचा ध्यास आणि देशाप्रती असलेली कळकळ देशाने पाहिली आहे. यामुळे तिसऱ्यांदा त्यांना पंतप्रधान पदाची धुरा सांभाळण्याची संधी जनतेकडून दिली जाणार आहे. मोदींची तिसऱ्या पर्वाकडे दमदार वाटचाल सुरू आहे. त्याचा आपल्याला हिस्सा व्हायचा आहे. असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले आहे. यावेळी सभेला उपस्थित असणारे आमदार प्रा. राम शिंदे यांनी सुद्धा कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगितले की, खासदार डॉ. सुजय विखे यांनी मागील पाच वर्षात जिल्ह्याच्या विकासात कोणतीही कसर सोडली नाही. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध लोक कल्याणकारी योजनांचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक गावागावात पोहचविला आहे. त्यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील तरूणांना रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. विखे यांनी मागील पाच वर्षात जिल्ह्यातील दळण वळणाच्या सेवा सुविधा वाढविण्यावर भर दिला आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोगार देण्याचे काम केले आहे. त्यांनी जिल्ह्याला केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून सर्वाधिक निधी आणण्याचे काम केले. यामुळे असा खासदार येणाऱ्या काळात जिल्ह्याच्या विकासासाठी काम करेल. यामुळे त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देणे गरजचे आहे. असे आवाहन त्यांनी दिले

# चौंडी (जामखेड ) येथून लोकसभा निवडणूक वंचितांच्या लढाईला सुरुवात

जामखेड तालुका प्रतिनिधी अजय अवसरे - आज दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळी चौंडी ता.जामखेड जि.अहमदनगर येथे वंचितांचे धनाजी व संताजी (आबा/सर) यांनी प्रचार लढ्याचे नियोजन केले.अहमदनगर दक्षिण लोकसभा निवडणूक मतदार संघाचे वंचित बहुजन आघाडी व ओबीसी बहुजन पार्टीचे अधिकृत उमेदवार मा.श्री.दिलीपजी खेडकर साहेब यांच्या प्रचाराचा शुभारंभ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून नारळ फोडून भंडाऱ्याची उधळण करून सुरुवात करण्यात आली . यावेळी वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा किसन चव्हाण यांनी अहमदनगर जिल्ह्यातून आलेल्या सर्व ओबीसी ,वंचित,भटके विमुक्त,आदिवासी,मुस्लिम,गरीब शेतकरी,अल्पसंख्यांक अशा सर्व कार्यकर्त्यांना प्रचाराविषयी मार्गदर्शन केले. तसेच वंचित चे नेते ड.डॉ.अरुण (आबा) जाधव यांनी सर्व कार्यकर्त्यांना आव्हान केले की वाडी,वस्त्या,गाव शहर,पिंजून काढा मा.आदरणीय



बाळासाहेब आंबेडकर यांची ताकद मजबूत करा जोरदार घोषणा देऊन मा.श्री.दिलीप खेडकर साहेब यांचे तोफा उडवून हलकी वाजवून चौंडी या ठिकाणी सर्व कार्यकर्त्यांनी स्वागत केले . यावेळी प्रा किसन चव्हाण सर (महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी) ड.डॉ.अरुण आबा जाधव (महाराष्ट्र राज्य समन्वयक वंचित बहुजन आघाडी) महादेव बांगर सर,शेख प्यारेलाल भाई (शेवगाव )तालुका वंचित बहुजन आघाडी) अरविंद साळवे,मा.आतिश (दादा) पारवे (जामखेड तालुका अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी) सोमनाथ भैलुमे,अजिनाथ शिंदे (शहर अध्यक्ष जामखेड) वैजीनाथ केसकर,संतोष चव्हाण,केशवराव खेडकर,मनोज कुमार खेडकर,प्रथमेश बांगर ,द्वरका पवार,तात्या मोरे,जगन्नाथ मोरे,आकाश जाधव,गौतम मोरे, अशोक रणदिवे,तुकाराम पवार नंदकुमार गाडे,मुस्तफा मदारी,रज्जाक मदारी,तसेच सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

अंकुश गायकवाड
मो.९८६०१४५४१२
सागर ग्लास
आमच्याकडे अल्युनियम
विन्डों, पार्टीशन तयार करून मिळेल
नगर रोड, पंचायत समिती समोर बीड ४३११२२

बीडचा
महाराष्ट्राचा महानायक
# लोकनायक
४
बुधवार दि.०१ मे २०२४

महाराष्ट्राचा महानायक दैनिक लोकनायक या वृत्तपत्राची यवतमाळ / अकोला आवृत्ती दिनांक १ एप्रिल २०२४ पासुन नियमित प्रकाशित होणार असुन याची सर्व प्रतिनिधी यांनी नोंद घ्यावी हि नम्र विनंती.



सुकांत प्रकाश वंजारी
उपसंपादक यवतमाळ

## उमेदवार श्रृंगारे यांना मताधिक्याने विजयी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत- प्रतापराव पाटील चिखलीकर

लोहा प्रतिनिधि - देशाला मोदीजी सारखे खंबीर नेतृत्व पाहिजे त्यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करायचे आहे.आळस बाजूला सारा.तुम्ही माझ्या सारखे नेतृत्व घडविले आहे.असे भावनिक साद घालत नांदेड मध्ये झालेल्यपु चुका टाळून गाव निहाय ग्रामपंचायत प्रमाणे प्रत्यक्ष मतदारांना भेटून विकासाचे निर्णय सांगावेत.सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेऊन लोहा विधानसभा क्षेत्रात खासदार सुधाकर श्रुंगारे याना मागील निवडणूकी एवढेच मताधिक्य देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन लातूरचे भाजपा निवडणूक नितीक्षक खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले आहे लोहा शहरातील व्यंकटेश गार्डन येथे लातूर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार सुधाकर शृंगारे त्यांच्या प्रचारार्थ बुथ प्रमुख व प्रमुख पदाधिकाऱ्यांची संवाद बैठक पार खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर याच्या उप-स्थितीत पार पडली. यावेळी उमेदवार खासदार सुधाकरर शृंगारे, मराठवाडा संघटक संजय कौडगे,माजी आमदार गोविंदआण्णा केंद्रे, तुकाराम वारकड गुरुजी, पक्षाचे जेष्ठ देविदास राठोड,रिपाई (आ) विजय सोनवणे, माणिकराव




मुकदम ,माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार ,सचिन पाटील चिखलीकर, बाबुराव केंद्रे उमरगेकर , राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष मनोहर पाटील. भोसीकर,भाजपा तालुकाध्यक्ष किशनराव डफडे,लोहा तालुकाध्यक्ष आनंदराव पाटील.ढाकणीकर, चित्ररेखाताई गोरे, सदाशिव अंभोरे, मिलिंद शिराढोणकर, दत्ता वाले, संजय देशमुख, भगवान राठोड, औरादकारताई,जयश्रीताई मामीडवार, केशवराव मुकदम, छत्रपती धुतमल,दता वाले, करीम शेख जफारोद्दीन बाहोद्दीन गणेशराव सावळे, सुभाष गायकवाड, केरबा वडवळे, , बालाजी खिल्लारे, नरेंद्र गायकवाड ,उत्तम सोनकांबळे, प्रकाश तोटावार, मधुकर डांगे, गणेश उबाळे, सुरेश महाबळे, चेतन केंद्रे, अपाराव पवार, मामा गायकवाड , सुरेश गायकवाड,प्रवीण धुतमल सह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते खासदार प्रतापराव पाटील यांनी कार्यकर्त्यांचे कान टोचले. ही निवडणूक देशाची आहे.खासदार श्रुंगारे गावातच आले नाहीत निधीच दिला नाही अशी नाराजी व्यक्त करण्याची ही वेळ नाही त्यांनी या मतदार संघासाठी भरपूर निधी दिला आहे आपणास तिसऱ्यांदा या देशाचे पंतप्रधान मोदीजी याना करायचे आहे .आळस झडकून कामाला लागा व मागील निवडणूकीत जे मताधिक्य आपण दिले होते तेवढे मताधिक्य द्यायचे आहे आपण माझ्या सारख्या कार्यकर्त्याला घडविले आहे अशी भावनिक साद घालत उमेदवार श्रुंगारे याना मोठे मताधिक्य देण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले आहे. उमेदवार श्रुंगारे यांनी आपला संपर्क कमी पडला असेल पण आपण निधी इमानेइतबारे दिला आहे चिखलीकर पिता-पुत्रांनी नेहमीच साथ दिली आहे यावेळी आपण मला मागील निवडणुकी प्रमाणेच मोठे मताधिक्य मिळेल असा आशावाद व्यक्त केला .यावेळी माजी आ गोविंद अण्णा केंद्रे, तुकाराम वरकड, माणिकराव मुकदम ,रिपाई प्रदेश उपाध्यक्ष विजय सोनवणे, बालाजी धनसडे, औरादकार मॅडम यांची भाषणे झाली प्रास्ताविक विधानसभा अध्यक्ष प्रवीण पाटील चिखलीकर यांनी केले आभार व संचलन भास्कर पवार यांनी केले

## दिड वर्षापूर्वीच्या हल्ल्याचा काढला वचपा ; युवकाला चाकूने भोसकले

यवतमाळ लोकनायक वृत्तसेवा : दिड वर्षापूर्वीच्या वादाचा बदला म्हणून शेजारी राहणाऱ्या युवकाचा चाकूने भोसकून खून करण्यात आला. ही घटना आज, मंगळवारी दुपारी शहरा-नजीक लोहारा येथे घडली.

जय विजय पाटील (२६) रा. पंचशिलनगर लोहारा असे मृताचे नाव आहे. त्याचा शेजारी राहणाऱ्या दिगांबर उर्फ दीक्षित हिरणवाडे याच्याशी वाद होता दोघांमध्ये नेहमीच खटके उडत होते. दोन वर्षापूर्वी शुभेच्छा फलक फाडल्यावरून प्रकरण विकोपाला गेले होते. त्यावेळी जय पाटील याने चाकू हल्ला करून दिगांबर हिरणवाडे याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. तेव्हा पाठीत खुपसलेला चाकू घेऊन दिगांबर शासकीय रुग्णालयात वेळेत पोहोचल्याने बचावला होता. शस्त्रक्रियेनंतर त्याचा जीव वाचला. मात्र त्यानंतर या दोघांत सतत वाद सुरू होते. दोघेही शेजारी राहत असल्याने हा वाद धुमसत राहिला. दिगांबर जुन्या हल्ल्याचा वचपा काढण्याच्या प्रतीक्षेत होता. आज त्याने जय पाटील हा ड्युटीवरुन परत आला असता वाद उकरून काढला व त्याच्यावर चाकूने वार केले. यात जय गंभीर जखमी झाला.कुटुंबीयांनी त्याला शासकीय रुग्णालयात आणले. तेथे त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, असे लोहारा पोलिसांनी सांगितले. या घटनेनंतर घटनास्थळी तणावाची स्थिति निर्माण झाली होती. किरकोळ कारणाने वाढत गेलेल्या वादातून तरुणाचा बळी गेल्याने परिसरात भीतीचे वातावरण आहे. या आठवड्यातील हा चौथा खून आहे.

## सर्पदंशाने चिमुरडीचा मृत्यू, वेळेवर उपचार झाले असते तर टळला असता अनर्थ

यवतमाळ लोकनायक वृत्त सेवा : मारेगाव तालुक्यातील टाकळी (कुंभा) गावात रात्रीच्या वेळेत घरात सर्पदंश झाल्याने दीड वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी रात्री घडली. काव्या वैभव खेवले असे मृत बालिकेचे नाव आहे.

काव्याला मण्यार या अतिविषारी सापाने दंश केला. ही बाब कुटुंबीयांच्या लक्षात येताच तिला तत्काळ मारेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र ठिकाणी तिच्यावर योग्य उपचार न झाल्याने तिचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी



केला आहे.या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. वेळेवर उपचार मिळाले असते तर तिचे प्राण वाचवता आले असते, असे ग्रामस्थांनी सांगितले. ग्रामस्थांनी आरोग्य प्रशासनाला धारेवर धरले असून, काव्याच्या मृत्यूला आरोग्य विभागच जबाबदार असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे.सध्या सर्वत्र अवकाळी पाऊस सुरू असून उकडाही वाढला आहे. त्यामुळे साप बिळातून बाहेर पडत आहे. ग्रामीण भागात सर्पदंश झाल्यास तत्काळ औषध-ोपचार मिळत नसल्याने या सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी आहे.

## शासकीय कार्यालयात दलाल झाले शिरजोर,अधिकाऱ्यांचे तोंडावर बोट

यवतमाळ लोकनायक वृत्तसेवा : नेर येथील शासकीय कार्यालयात वाढलेला दलालांचा वावर सर्वसामान्य नागरिकांसाठी चांगलीच डोकेदुखी ठरला आहे. विविध कामांसाठी आर्थिक पिळवणूक होत आहे. सावजाच्या शोधात दलाल जागोजागी दिसत असतानाही संबंधित कार्यालयाच्या अधिकाऱ्यांचे तोंडावर बोट असल्याने विविध शंका उप-स्थित केल्या जात आहे. मात्र, यात नागरिकांना त्रासाला सामारे जावे लागत आहे.येथील तहसील कार्यालयात शहरासह ग्रामीण भागातील नागरिक विविध कामे घेऊन येतात. शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, सर्वसामान्य नागरिकांचा यात समावेश असतो. कुठल्या तरी कामासाठी त्यांना दाखल हवा असतो, रेशनकार्ड काढायचे असते. यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची लांबलचक यादी असते. एखादा कागद कमी असल्यास दाखल्याचा अर्ज अडल्याशिवाय राहात नाही. यासाठी अधिकारीस्तरावर कुठलेही मार्गदर्शन होत नाही. परंतु, एखादा कागद कमी असलेला अर्ज दलालामार्फत सादर झाल्यास विनात्रास पास होतो, हा अनेकांचा अनुभव आहे.भूमी अभिलेख कार्यालयात तर अधिकारी, कर्मचाऱ्यांपेक्षा दलालांचीच संख्या अधिक दिसते. कर्मचारी सापडणार नाही; पण दलाल हमखास मिळतो. या कार्यालयात कुठलेही काम दलालाशिवाय झाल्यास नशीबच समजावे लागेल. एवढा या कार्यालयात दलालांचा वट आहे. काम कसे करून घ्यायचे याचा सल्ला दलालच देतात. परंतु, तो फुकट नसतो, हे सर्वश्रुतच आहे.नेर येथील कृषी कार्यालयाची परिस्थिती यापेक्षा काही वेगळी नाही. आर्थिक परिस्थितीने जर्जर झालेला शेतकरी या कार्यालयात आपली विविध कामे घेऊन येतात. या कार्यालयात त्यांची अडवणूक होते. अशावेळी त्यांना दलालांचा आधार घ्यावा लागतो. मग कामाचा मार्ग सुकर झाल्याचा अनेकांचा अनुभव आहे.नेर येथील वीज कंपनीच्या कार्यालयातही दलालांचीच चलती असल्याचे दिसून येते. वीजविषयक निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यासाठीही मध्यस्थाची साथ घ्यावी लागते. नवीन मीटर,अवाजवी वीज बिल या अडचणी दूर करण्यासाठी कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळत नाही. त्यामुळे त्रस्त नागरिक दलालांना गाठतात. हे चित्र या कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांपुढे दररोज असते. दलालांना बाहेर काढण्यासाठी कुणीतरी प्रयत्न करावे, अशी अपेक्षा त्रस्त नागरिकांना आहे.

कर्मचाऱ्यांसोबत उठबस वाढली दलालांची शासकीय कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसोबत उठबस वाढली आहे. शिवाय, त्यांच्यासोबत चहापाणी घेणे, नाश्ता करणे अशी त्यांची दीनचर्याही सुरू झाली आहे. या बाबी दलालांसाठी पोषक ठरत आहेत

## निकालानंतर आचारसंहितेत अडकले नियुक्ती आदेश

यवतमाळ लोकनायक वृत्तसेवा : जिल्हा परिषदेअंतर्गत गट 'क' संवर्गातील सरळसेवेसाठी लेखी परीक्षा घेण्यात आली.त्याचा निकाल टप्प्याटप्प्याने जाहीर करण्यात आला; मात्र निकाल जाहीर झाल्यानंतर आठ संवर्गात नोकरीसाठी पात्र उमेदवारांचे नियुक्ती आदेश आचारसंहितेत अडकले आहेत. लोकसभा निवडणुकीचे मतदान आटोपल्यावर जिल्हा परिषद प्रशासनाने निवडणूक विभागाकडे परवानगी मागितली आहे.जिल्हा परिषदेने २५ संवर्गातील ८७५ रिक्त पदे भरण्यासाठी ऑनलाइन अर्ज मागितले होते.नोकरीच्या प्रती-क्षेत असलेल्या आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी ही एक संधी चालूनआली. त्यामुळे तब्बल ८८ हजारांवर उमेदवारांनी अर्ज केले. त्यानंतर उमेदवारांनी लेखी परीक्षा दिली. टप्प्याटप्प्याने निकाल जाहीर झाले. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी ११ संवर्गातील उमेदवारांची तात्पुरती आणि अंतिम यादी प्रसिद्ध करून २८ पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश दिले. दरम्यानच्या कालावधीत आठ संवर्गाचेनिकाल प्रसिद्ध करण्यात आले; मात्र आच-ारसंहिता लागू झाल्याने अंतिम यादी प्रसिद्ध करून नियुक्ती आदेश देता आले नाही. पात्र उमेदवारांना जिल्हा परिषदेत बोलावून त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. जे उमेदवार पडताळणीसाठी आले नाहीत त्यांना अंतिम सूचना देण्यात येत आहे.आता लोकसभा निवडणुकीसाठीची मतदान प्रक्रिया आटोपली आहे. त्यामुळे नोकरीसाठी पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यासाठी जिल्हा निवडणूक विभागाकडे परवानगी मागण्यात आली आहे. परवानगी मिळताच नियुक्ती आदेश देण्याची प्रक्रिया पार पडणार असल्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाकडून देण्यात आली.सीईओंनी कक्षात घेतला आढावा मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी सरळसेवा पदभरतीचा सोमवारी आढावा घेतला. यावेळी उमेदवारांच्या कागदपत्राच्या पडताळणीची माहिती त्यांनी विभाग प्रमुखां- कडून जाणून घेतली. निवडणूक विभागाकडून परवानगी मिळताच नियुक्ती आदेश तत्काळ देण्याचे संकेत सीईओ मंदार पत्की यांनी बैठकीत दिले.

## ओबीसी नेत्याला बॅनरवर डावलल्याने भुजबळ समर्थक ओबीसी मतदार पंकजाताई मुंढे यांना मतदानातून धडा शिकवणार - बापू गाडेकर

शेख आतिख/तलवाडा - बीड जिल्ह्यात लोकसभा निवडणूकीसाठी महायुतीकडून पंकजाताई मुंढे, महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे व वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोकराव हिंगे यांच्यात तिरंगी लढत होत असताना या निवडणूकीत जातीपातीच्या राजकारणाला चांगलेच उधाण आले आहे. महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंढे यांनी आपल्याला मराठा समाजाची मते मिळणार नाहीत या भितीपोटी त्यांनी महाराष्ट्रात नव्हे तर देशपातळीवर ओबीसी समाजाचे नेतृत्व करणारे मा.ना.छगनरावजी भुजबळ साहेब यांचा फोटो बॅनरवर न टाकण्याचा कुटील डाव आखल्याने भुजबळ समर्थक ओबीसी मतदार व कार्यकर्ते नाराज झाले असून ओबीसी नेत्याला बॅनरवर डावलल्याने भुजबळ समर्थक ओबीसी मतदार पंकजाताई मुंढे यांना मतदानातून धडा शिकवणार असल्याचे मत महात्मा फुले समता परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष तथा पत्रकार - बापू गाडेकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे व्यक्त केले आहे. बारा बलुतेदार व आठरा आलुतेदार प्रवर्गातील मुळ ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी मा.ना.छगनरावजी भुजबळ साहेब हे जवळपास तीस ते पस्तीस वर्षांपासून संघर्ष करत आहेत. महाराष्ट्रातील मुळ ओबीसी समाजाला शिक्षण, नौकरी व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण मिळवून देण्यासाठी भुजबळ साहेबांनी सरकार दरबारी व न्यायालयात दाद मागून मोठा संघर्ष केलेला आहे. मराठा समाजाला देखील स्वतंत्र आरक्षण मिळाले पाहिजे अशी भुमिका देखील त्यांनी सरकार दरबारी मांडलेली आहे. परंतु आरक्षणाच्या या लढाईत मराठा समाजाने विनाकारण भुजबळ साहेबांना टार्गेट करून बदनाम करण्याचे काम केले आहे. मा.मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे सरकारने मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करून मुळ ओबीसी असलेल्या बारा बलुतेदार व आठरा आलुतेदार प्रवर्गातील समाजावर अन्याय करण्याचे काम केल्यामुळे ओबीसी समाज खऱ्या अर्थाने संकटात सापडला होता. एकीकडे आरक्षणासाठी मराठा समाजाचे आंदोलन सुरू असताना दुसरीकडे मुळ ओबीसी समाज दहशतीखाली वावरत होता. त्यावेळी स्वतः ला ओबीसी म्हणून घेणारा एकही नेता पुढे येऊन ओबीसी समाजाला आधार द्यायला तयार नव्हता. ओबीसी समाज भयभीत झालेला असताना त्यांच्या आरक्षणाचे संरक्षण करण्यासाठी भुजबळ साहेबांनी ओबीसी आरक्षण बचाव महाएल्गार मेळावे घेतले. त्यावेळी ओबीसी चेहरा असलेल्या नेत्या पंकजाताई मुंढे कोणत्या बिळात जाऊन बसल्या होत्या ? असा प्रश्न आता ओबीसी समाजाला पडला आहे. बारा बलुतेदार व आठरा आलुतेदार प्रवर्गातील मुळ ओबीसी समाजाला एकत्रित करून त्यांना धीर आणि आधार देण्यासाठी देशपातळीवर ओबीसी समाजाचे नेतृत्व करणारे मा.ना.छगनरावजी भुजबळ साहेब जेव्हा ओबीसी महाएल्गार मेळाव्याच्या माध्यमातून मैदानात उतरले तेव्हा त्यांना माजीमंत्री महादेव जानकर, आ.गोपीचंद पडळकर, प्रकाश अण्णा शेंडगे, शब्बीर अन्सारी, लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण हाके, प्रा.टी.पी.मुंढे, प्रा.पी.टी.चव्हाण, अँड.सुभाष राऊत यांच्यासह इतर नेते व कार्यकर्त्यांनी खंबीरपणे साथ दिली. परंतु माजीमंत्री पंकजाताई मुंढे यांनी मात्र संकटकाळात ओबीसी समाजाला वाऱ्यावर सोडण्याचे काम केले होते. आता त्यांना मतदानासाठी ओबीसी समाज हवा आहे. या निवडणूकीत जातीपातीच्या राजकारणाला थारा न देता बीड जिल्ह्याचा विकास करण्यासाठी मला एक संधी द्या अशी विनवणी त्या मतदारांना करत आहेत. मुळ ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये यासाठी ज्या भुजबळ साहेबांनी संघर्ष केला त्या नेत्याला बॅनरवर स्थान न देण्याचं काम पंकजाताई मुंढे यांनी केलं आहे. जर भुजबळ साहेबांचा फोटो बॅनरवर टाकला तर आपल्याला मराठा समाजाची मते मिळणार नाहीत अशी भिती त्यांना वाटत असावी म्हणूनच त्यांनी बॅनरवर फोटो टाकला नाही अशा चर्चा भुजबळ समर्थक ओबीसी मतदारांकडून ऐकावयास मिळत आहेत. ओबीसी नेते मा.ना.छगनरावजी भुजबळ यांना बॅनरवर डावलल्याने भुजबळ समर्थक ओबीसी कार्यकर्ते व मतदार नाराज झाल्याचे चित्र गेवराई तालुक्यासह बीड जिल्ह्यात पहावयास मिळत असून महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथ मुंढे यांना भुजबळ समर्थक ओबीसी मतदारांनी मतदान का करावे ? असा प्रश्न महात्मा फुले समता परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष - बापू गाडेकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाच्या माध्यमातून उपस्थित केला आहे.

लोकनायक
बुधवार दि.०१ मे २०२४


# बजरंग बप्पाच्या विजयासाठी प्रत्येकाचा उंबरा झिजवणार

## गावभेटी दौऱ्यात पुजाताई मोरे यांचे प्रतिपादन

**शेख आतिख लोकनायक वृत्तसेवा –** बजरंग बप्पा सोनवणे यांच्या विजयासाठी गेवराई विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक उंबरा झिजवून त्यांच्या विजयासाठी सर्वाधिक मताधिक्क्य देणार असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पुजाताई मोरे यांनी केले आहे. बाग पिंपळगाव, बेलगाव, धोंडराई कॅम्प, धोंडराई, तळणेवाडी, भोजगाव, कामखेडा, दगडी शहाजनपुर, आहेर चिंचोली, पारगाव जप्ती, हिरापूर, उमापूर, महारटाकळी, धुमेगाव, चकलांबा, हिवरवाडी, महांडूला, पवळाचीवाडी, ब्रह्मगाव, माटेगाव, देवपिंपरी, राजपिंपरी, रसुलाबाद, भाटअंतरवाली, बोरीपिंपळगाव, कामखेडा, दगडीशहाजनपुर, आहेर चिंचोली, तांदळवाडी, पारगाव जप्ती, हिरापूर या ठिकाणी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या.महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ त्या बोलत होत्या. पुढे बोलताना त्या म्हणाल्या, बीड जिल्ह्यातील शेतकर्यांचा आर्थिक विकास साधण्याचे काम बजरंग बप्पांनी त्यांच्या दोन्ही कारखान्याच्या माध्यमातून केले आहे. केज, अंबाजोगाई, परळी, बीड, माजलगाव या भागातील ऊस उत्पादक शेतकर्यांना बजरंग बप्पांच्या कारखान्याची खूप मोठी मदत झाली आहे. एका



वर्षी अतिरिक्त ऊस झाल्याने माजलगाव तालुक्यात त्याचा मोठा फटका बसला. पण त्यासाठी बजरंग बप्पांचा दोष नाही. धारूरचा घाट अरूंद ठेवून तेथून ट्रॅक्टरने ऊसाची वाहतूक होऊ नये, यासाठी कोण प्रयत्न करतंय? का म्हणून तुम्ही शेतकर्यांच्या उसासाठी आडवे येत आहात? माजलगावच्या ऊस उत्पादकांना ज्यादा भाव मिळाला तर आपल्याला देखील जादा भाव द्यावा लागेल, असे वाटत असल्यानेच काही स्थानिक नेत्यांनी धारूरच्या घाटातून ऊस नेता येणार नाही, अशा प्रकारचे काम केले. त्यामुळे माजलगावच्या शेतकर्यांचा ऊस गेला नाही, किंवा बजरंग बप्पांनी नेला नाही यावर कोणीही विश्वास ठेवू नये. ऊस त्यांनी घेऊन जावू नये म्हणून बजरंग बाप्पाला धारूरच्या घाटाखाली उतरून न देणारे माजलगावच्या त्या नेत्यांना शेतकर्यांनी ओळखले पाहीजे. बजरंग सोनवणे यांना यावेळी गेवराई आणि माजलगाव मतदारसंघातून जास्तीत जास्त लीडने निवडून द्या, शेतकर्यांचा ऊस बांधावर वाळणार नाही, याची काळजी येणार्या काळात बजरंग बप्पा सोनवणे घेतील, असा विश्वास देखील पुजाताई मोरे यांनी व्यक्त केला आहे. गेवराई मतदारसंघात जे कोणी उसाचे राजकारण करू पाहतात त्यांना बजरंग बप्पाच्या रुपाने तगडा प्रतिस्पर्धी मिळणार आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे येथील शेतकर्यांची जी पिळवणूक सुरू होती त्याला ब्रेक मिळेल. येथील कारखानदारांनी आमच्या घामाचे पैसे हडपले. रिकव्हरी चोरण्याचे पाप केले. त्यामुळे आमच्या उसाला कधी जादा दरच मिळालेला नाही. हे थांबवायचे असेल तर बजरंग बप्पा सोनवणे हे आपल्यासाठी उत्तम पर्याय आहेत असे देखील पुजाताई मोरे म्हणाल्या.

## भा.द.वि. कलम ३०७ मध्ये अटकपूर्व जामीन मंजूर

**अंबाजोगाई लोकनायक वृत्तसेवा –** अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्यायालय-३ मा.श्री व्ही.के. मांडे साहेब यांचे न्यायालयाने जामीन अर्ज क्र.१५९/२०२४ काशिनाथ वि.सरकार या प्रकरणात आरोपी काशिनाथ सुखदेव राठोड,राजकुमार विठ्ठल राठोड यांना अटकपूर्व जामीनवर मुक्त केल.आरोपीतर्फे आरोपीतर्फे अँड. आर.एम.धायगुडे यांनी काम पाहिले तर त्यांना अँड.जी.डी. कांदे,अँड.डी.ए. लोंढाळ, अँड.अविनाश धायगुडे यांनी सहकार्य केले. प्रकरणाची



थोडक्यात हाकिकत की,प्रकरणातील फिर्यादी सुग्रीव शंकर पवार याने पोलीस स्टेशन परळी (ग्रा.)येथे फिर्याद दिली की,आमचे राशन दुकानाबाबत तहसील कार्यालय परळी येथे वारंवार तक्रार का करतोस असे म्हणत त्रिंबक हा म्हणाला की सुग्रीव लय माजला आहे त्याची बघावी लागेल असे म्हणाला तेव्हा मी त्यास म्हणालो की तुम्ही गावचे राशन बरोबर वाटप करा मी इथून पुढे तक्रार करणार नाही असे म्हणत असताना त्या दोघांनी माझी कॉलर धरून मला लाथा बुक्क्याने मारहाण करण्यास सुरुवात केली मी आरडाओरडा करताच तेथे काशिनाथ सुखदेव राठोड, राजकुमार विठ्ठल राठोड हे आले तेव्हा धर्मराज राठोड याने त्याचे घरात जाऊन कोयता व कत्ती घेऊन आला तेव्हा आमच्या भांडणाचा आवाज ऐकून माझा भाऊ भीमराव शंकर पवार तिथे आला तो आमच्या भांडणाची सोडवा सोडव करत असताना धर्मराज याने माझे डोक्यात कोयता मारून रक्त काढून जखमी केले व त्रिंबक विठ्ठल राठोड तुम्हाला जीवे मारून टाकीन अशी धमकी देऊन त्याचे हाथातील कतीने माझा भाऊ भीमराव यास जीवे मारण्याचे उद्देशाने त्याचे डोक्यात मारून डोके फोडून त्याला गंभीर जखमी केले. त्याच्यासोबत असलेले काशिनाथ राठोड,राजकुमार राठोड यांनी पण मला व माझ्या भावाला खाली पाडून लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या व म्हणाले की तुला जीवेच मारायचे होते पण सोडून देतो इथून पुढे आमचे विरुद्ध अर्ज बाजारी करायचे नाही असे म्हणून शिवीगाळ केली व तेथून सर्व निघून गेले अशा आशयाची परळी (ग्रा.) येथे फिर्यादी दिल्यावरून गु.र.क्र. १०६/२०२४ कलम ३०७,३२४,३२३,५०४,५०६, ३४ भा.द.वी. प्रमाणे गुन्हा नोंद झाला.आरोपींना पोलीस अटक करण्याची भीती असल्याने आरोपींनी अँड. आर.एम.धायगुडे यांचे मार्फत जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालय अंबाजोगाई येथे दाखल केला. प्रकरणात दोन्ही पक्षाचे म्हणणे एकूण मा.न्यायालयाने आरोपींना अटकपूर्व जामीन वर मुक्त केले .आरोपीतर्फे अँड. आर.एम.धायगुडे यांनी काम पाहिले तर त्यांना अँड.जी.डी. कांदे,अँड.डी.ए. लोंढाळ, अँड.अविनाश धायगुडे यांनी सहकार्य केले..

## योगेश्वरीत महिलाआत्मभान प्रशिक्षण शिबीर

**अंबाजोगाई लोकनायक वृत्त-सेवा –** योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी,श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने ०१ मे ते ०८ मे पर्यंत चालणाऱ्या महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन ०१ मे रोजी श्रीमती गो कु यो कन्या विद्यालयात होत असून अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर हे असून उद्घाटक म्हणून अबाजोगाईच्या अतिरिक्त पोलीस अधिक्षक चेतना तिडके तर विशेष निमंत्रित संस्थेच्या माजी विद्यार्थिनी व राष्ट्रीय हॉकीपटू श्रेया पवार आदी उपस्थित राहणार आहेत. या शिबीरात गुरुवार ०२ मे रोजी कोल्हापुर जिल्हयातील कुरूंदवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब नदाफ हे 'सावित्रीच्या लेकींनो पुढे-पुढे जाऊ' या विषयावर बोलणार आहेत शुक्रवार ०३ मे रोजी पुणे येथील सामाजिक कार्यकर्त्या निलम पंडीत ह्या भारतीय संविधान व महिलांचे अधिकार या विषयी मनोगत व्यक्त करतील पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते सामाजिक कार्यकर्ते संदीप बर्वे हे संविधान भान याविषयी भावना व्यक्त करतील शनिवार०४ मे रोजी छत्रपती संभाजीनगरच्या समिता जाधव ह्या 'मुली आणि समाज-माध्यमे' या विषयी बोलणार आहेत तर रविवार ०५ मे ला नागपुरच्या सामाजिक कार्यकर्त्या विजया मारोतकर ह्या 'पोरी जरा जपून याविषयी तर सोमवार ०६ मे बीड जिल्हयाच्या शिरूर येथील सामाजिक कार्यकर्त्या मयुरी राजहंस ह्या 'मुलींचे समाजभान' या विषयी तर ०७ मे रोजी जालन्याच्या पोलिस निरीक्षक प्रणिता गायकवाड 'स्वसंरक्षण' या विषयावर मत व्यक्त करणार आहेत ०८ मे रोजी शिबीराचा समारोप सहयाद्री वाहिनीच्या वृत्त निवेदिका ज्योती अंबेकर तसेच योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ सुरेश खुरसाळे यांच्या उपस्थितीत होईल. या सर्व कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन शिबीर प्रमुख तथा यो.शि.संस्थेचे संचालक भीमाशंकर शेटे,यो.शि. संस्थेचे उपाध्यक्ष जी. बी.व्यास,कार्यकारी उपाध्यक्ष ड.जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेष वैद्य,संचालिका प्रा.डॉ. जयश्री देशपांडे,ड. कल्याणी विर्धे,प्राचार्य पी.आर.थारकर, समन्वयक प्रा.प्रविण भोसले यांच्या वतीने करण्यात आले आहे.


### जाहिर प्रगटन

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

**npghansawangigmail.com PHno02483-271787,**

**जा.क्र.२०२४/नपघ/जा.प्र./कावी-१०७३ दिनांक:- ३०/०४/२०२४**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शिवप्रसाद मसुलाल शेडुते रा. ता. घनसावंगी जि.जालना यांनी नामे युवराज बापुसाहेब देशमुख रा. ता.घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १०२८ दि. २३/०३/२०२४ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १०८० दिनांक:- १५/०४/२०२४ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे युवराज बापुसाहेब देशमुख रा. ता. घनसावंगी जि.जालना नावावर असलेला गट नं (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्र ८५१ व ८५१/१ मधील एकुण क्षेत्र १५१.०० चौ.मी ठ.उ.उ बांधकाम नावे करणेस्तव ज्याची **चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.**

**पुर्व:- कुंभार पिंपळगाव - अंबड रोड**
**पश्चिम :- शेख शब्बीर शेख चांद यांची जागा**
**दक्षिण :- अयाजखान गुलशेरखान पठाण यांची जागा**
**उत्तरेस :- सचिन पंजाबराव देशमुख यांची जागा**

या वरील चतु:सिमा मधील १५१.०० चौ.मी ठ.उ.उ बांधकाम जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत घनसांवगी**

### जाहीर नामा

**जा. क्र./ न. प. अंबड नामांतर २०२४/३०५**
**दिनांक-२५/०४/२०२४**
**कार्यालय नगर परिषद अंबड**

**नाव बदलण्याचा**

**अर्जदार- जनाबाई पंडित शिंदे**
**रा.अंबड ता.अंबड जि.जालना**
**प्रकरण-सि.स.नं.१४८९,न.प.मि.नं.९-५/२ - चे हस्तांतरण करणे बाबत**

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (----- ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला - येथे ईमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छितो ज्यांची चतुःसा खालील प्रमाण आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

**चतुः सिमा**
**पूर्व - वापराचा रस्ता**
**पश्चिम - मुक्ताबाई जाधव यांची जागा**
**दक्षिण - वागण्याचा रस्ता**
**उत्तर - राजाभाऊ नखाते यांची जागा**

**आदेशावरून**
**मुख्याधिकारी**
**न.प.अंबड**

### जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**

**दुरध्वनी क्रमांकः-०२४८३-२७२१८६ फॅक्स क्रमांकः-**
E-Mail ID: tahghangmail. **संकेतस्थळः**
**जा.क्र.२०२३/एमएजी/कावी--- दिनांक:-३०/०४/२०२४**

**कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म मृत्यु प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

सर्व जनता मौजे खडका ता. घनसावंगी यांना या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, श्री./ श्रीमती/कु. बबन रेणाजी ठोके रा. खडका ता. घनसावंगी जि. जालना येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, शाम प्रतिज्ञापत्र, देवुन त्यांनी त्यांचा/त्यांची आई/मूलगा नामे शाम बबन ठोके यांच्या/हिच्याजन्म/मृत्युची दि.०३/०२/१९९९ ही दर्शविलेली आहे. अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर / हरकती/ आक्षेप/ आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०४/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी**

### जाहिर प्रगटन

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

**npghansawangigmail.com PHno02483-271787,**
**जा.क्र.२०२४/नपघ/जा.प्र./कावी-१०७१ दिनांक:- ३०/०४/२०२४**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार तब्बसुमबी दिलावर शेख रा. ता.घनसावंगी जि. जालना यांनी नामे सलमा युसुफ अन्सारी रा. ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३०३५ दि. २४/१२/२०२० या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं ९१३ दिनांक:- १९/०३/२०२४ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे सलमा युसुफ अन्सारी रा. ता.घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट ने (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं - १६६४/२३,२४,२६,२१ मधील एकुण ४ मिळकतीचे क्षेत्र २९७.३९ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

**मिळकत क्रं. १६६४/२३ व १६६४/२४ चतु:सिमा**
**पुर्व: १८.६ फुटाचा रस्ता**
**पश्चिम :- १८.६ फुटाचा रस्ता**
**दक्षिण :- सलमा युसुफ अन्सारी यांची जागा**
**उत्तरेस : यासीनखा झानखा पठाण यांची जागा**
**मिळकत क्रं, १६६४/२१ व १६६४/२६ चतु: सिमा**
**पुर्व: १८.६ फुटाचा रस्ता**
**पश्चिम :- सखाराम गंगतिरे यांची जागा**
**दक्षिण:- सलमा युसुफ अन्सारी यांची जागा**
**उत्तरेस :- सलमा युसुफ अन्सारी यांची जागा**

या वरील चतु:सिमा मधील २९७.३९ चौ. मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत घनसांवगी**

### जाहिर प्रगटन

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

**जा.क्र.२०२४/नपघ/जा.प्र./कावी-१०७१ दिनांक:- ३०/०४/२०२४**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नसरीनबी शेख महेबुब रा. ता. घनसावंगी जि. जालना यांनी मिळकत के २८८/१ मधील जागा अब्दुल शेरू सय्यद यांच्या नावे नोंद असुन नामातर करण्यासाठी आवक क्र. १११२ दि. १६/०४/२०२४ अर्ज सादर केला आहे. अर्जासोबत ०१. अनुसुची क्रे ०२ ०२. अर्ज ०३. शंभर रुपाये मुल्याचे मुद्रांक क्रं २४११ दि. १६/०४/२०२४ ०३. नसरीनबी शेख महेबुब यांचे आधार कार्ड झेरॉक्स प्रत इ. कागदपत्र जोडले आहे. ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

**चतुः सिमा**
**पुर्व - शेख सांडू सदरु यांची जागा**
**पश्चिम - शेख फतरु व शेख अब्दुल रशीद यांची जागा**
**दक्षिण - सरकारी रस्ता**
**उत्तर - इरफान अमीन कुरेशी यांची जागा**

या वरील चतुःसिमा मधील मिळकत क्रे २८८/१ ची मधील जागा नसरीनबी शेख महेबुब यांच्या नावे जोडलेल्या वाटणीपत्र व वरील पुराव्या आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही आक्षेप /उजर/ तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत घनसांवगी**




बीडचा
महाराष्ट्राचा महानायक
# लोकनायक
६
बुधवार दि.०१ मे २०२४




# आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास निदर्शनास आणून द्यावे : निवडणूक निरीक्षक अजीमूल हक

**लोकनायक वृत्तसेवा –** आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहन बीड मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक अजीमूल हक यांनी मंगळवारी चिन्ह वाटपाच्या समयी राजकीय पक्षांना केले. राजकीय पक्षांची चिन्ह वाटपाची बैठक तसेच राजकीय पक्षांनी यापुढे घ्यावयाची काळजी या संदर्भातील सूचनांची माहिती देण्याकरिता जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे आणि निवडणूक निरीक्षक अजीमूल हक यांच्या प्रमुख उपस्थितीत बोलविण्यात आली होती. त्यावेळी श्री हक यांनी ही





माहिती दिली. यांनी सांगितले सायंकाळी ५ ते ६ या वेळेत शासकीय विश्रामगृह येथे राहणार असून माझ्याशी थेट संपर्क करता येईल. यावेळी त्यांनी त्यांचा संपर्क क्रमांक ९४०४५९२५११ राजकीय पक्षांना दिला आहे. निवडणूकीच्या काळात प्रत्येक घरावर एका पक्षाचे तीन अथवा तीन पक्षाचे एक-एक ध्वज लावता येतील. गाड्यांवर बॅनर लावता येणार नाही. स्टिकर लावण्यास हरकत नाही. मात्र पुर्वपरवानगी शिवाय लावू नये. निवडणूक काळात आदर्श आचारसंहिताचे पालन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून त्याला सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिलेली आहे. श्री हक यांनी काही मुद्दे आवर्जून सांगितले यामध्ये कोणत्याही पक्षाने तात्पुरत्या स्वरूपात सुरू केलेल्या संपर्क कार्यालयाबाबतची माहिती निवडणूक विभागास द्यावी. संबंधित कार्यालय हे मतदान केंद्राच्या २०० किलोमीटरच्या परिसरात नसावे. तसेच कुठल्याही खाजगी अथवा शासकीय रुग्णालयाच्या शेजारी नसावे. ध्वनी प्रदूषण होणार नाही याची काळजी राजकीय पक्षांनी घ्यावी. प्रचार प्रसार करताना संरक्षण विभागातील कुठलाही शस्त्रसामुग्री अथवा सैनिकी चिन्हाचा वापर करू नये. प्रचारामध्ये बालकांचा उपयोग होणार नाही याची दक्षता घ्यावी. बाल कामगारांच्या कायद्याच्या विरोधात असल्याचे सांगितले. भारत शासनाने प्लास्टिक बंदी केली असून प्लास्टिकचा वापर प्रचारादरम्यान करू नये. सीव्हीजीएल प चा वापर करून आचारसंहितेचा भंग झाल्यास निदर्शनास आणून द्यावे हा प सर्वांसाठी उपयोगी असून १०० मिनिटाच्या आत प वर तक्रार केल्यास कारवाई करण्यात येते. नागरिकांच्या मूलभूत अधिकाऱ्यांना प्रचारादरम्यान हनन होणार नाही, याची दक्षता घ्यावी. **पान २ वर**

# पालकमंत्र्यांना बहिणीला पाडण्याची घाई झाल्याचे त्यांच्या भाषणातून जाणवते – बजरंग बप्पा सोनवणे

**लोकनायक वृत्तसेवा –** मागील पंधरा दिवसापासून मी पालकमंत्र्यांना जरा सबुरीने घ्या असा सल्ला देतोय पण ते काही ऐकत नाहीत ते रोज आपल्या बहिणीच्या अडचणी वाढवणारी वक्तव्य करत आहेत एकूणच त्यांची सगळी धावपळ बहिणीचा पराभव करण्यासाठीच आहे कि काय असा प्रश्न प्रकर्षाने जाणवू लागला असल्याचे मत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी आष्टी तालुक्यातील आपल्या प्रचार सभेदरम्यान व्यक्त केले.



लोक ऐकत नाहीत अस म्हणणाऱ्या सरपंचानी लोकप्रतिनिधींच्या दारात जाऊ नये असे वादग्रस्त वक्तव्य पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केल्यानंतर या वक्तव्यावरून त्यांच्यावर टीकेची झोड उठली असून सरपंच संघटनाही यावरून आक्रमक झाल्याचे दिसत आहेत आता त्यांच्या याच वक्तव्यावरून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनीही त्यांना घेरले आहे सोनवणे यावर बोलताना म्हणाले कि ; निवडणुकीत टोकाची व व्यक्तिगत टीका होणार नाही याची दक्षता घ्या थोड सबुरीने घ्या असा मैत्रीचा सल्ला आपण पालकमंत्र्यांना दिला पण ते काहीकेल्या थांबताना दिसत नाहीत रोज नवनवीन आरोप करत आहेत **पान २ वर**

# हातभटी दारू तयार करणारा आणि विकणारा आरोपी अटक!

**लोकनायक वृत्तसेवा –** लोकसभा निवडणूक २०२४ शांततेत पार पाडण्यासाठी, अवैध धंदे बंद करण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक, बीड यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी विशेष मोहीम राबवून अनेक गुन्हेगारांना अटक केली आहे. दिनांक ३०/०४/२०२४ रोजी, पोउपनि मुरकुटे यांच्या पथकाने पोलीस ठाणे चकलंबा हद्दीतील उमापूर मध्ये गस्त लावत असताना गुप्त माहिती मिळाली की, एक व्यक्ती रसायनाच्या मदतीने हातभट्टी दारू तयार करून विक्री करत आहे. या माहितीनुसार त्वरित कारवाई करत, पथकाने दुपारी ०१:३० वाजता त्या व्यक्तीच्या घरावर छापा मारला. अंकुश दीपचंद जाधव नावाचा आरोपी, गणेश नगर, उमापूर, तालुका गेवराई, जिल्हा बीड येथे राहणारा, गुळ आणि रसायनांच्या मिश्रणापासून हातभट्टी दारू तयार करताना सापडला. त्याच्याकडून १७,००० रुपये (रसायन आणि तयार दारू) जप्त करण्यात आले आणि त्याच्याविरुद्ध पोलीस ठाणे चकलंबा मध्ये दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगिरी मा.श्री. नंदकुमार ठाकुर पोलीस अधीक्षक,बीड, मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संतोष साबळे **पान २ वर**

# बजरंग बप्पा सोनवणे यांना विक्रमी मतांनी विजयी करा- जिल्हाप्रमुख वरेकर

**लोकनायक वृत्तसेवा –** बीड लोकसभा मतदारसंघातील लोकसभेची निवडणूक येत्या १३ मे रोजी होत आहे खासदार कुणाला करायचय याचा फैसला तुम्हाला करायचाय , गेल्या दहा वर्षांत भाजपने केलेली फसवणूक,चालवलेली हुकूमशाही, आपल्यासोबत केलेला जुलूम तुम्हाला मान्य आहे का ? असा सवाल करित येणाऱ्या १३ तारखेला देशातून भाजप व जिल्हातून मुंढेशाही हद्दपार करण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या तुतारी या चिन्हावर प्रचंड मतदान करून बजरंग बप्पा सोनवणे यांना



निवडून द्यावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी बीड तालुक्यातील कोल्हारवाडी गावात बोलताना केले, यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख राजुभाऊ महुवाले, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, विधानसभा प्रमुख सुशिल भैय्या पिंगळे ,ह.भ.प. काशीनाथ महाराज रांजवण, महिला आघाडीच्या विधानसभा संघटिका मीराताई नवले , रमेश नवले ,यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी गावकऱ्यांच्या वतीने मान्यवरांनचा सन्मान करण्यात आला.पुढे **पान २ वर**

# विकासाच्या नावाखाली थापा मारणाऱ्यांना जनता घरचा रस्ता दाखवणार

## सोमठाणा येथील प्रचार सभेत डॉ.कल्याण काळे यांनी व्यक्त केला विश्वास

**जालना लोकनायक वृत्तसेवा –** विकासाच्या नावाखाली केंद्रातील भाजपा सरकारने मागील दहा वर्षात केवळ थापा मारण्याचे काम केले आहे.महागाई,बेरोजगारी वाढली असून मालाला योग्य भाव मिळत नसल्याने त्रस्त झालेल्या



शेतकऱ्यांसह सर्व सामान्य जनता या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना घरचा रस्ता दाखवणार असल्याचा विश्वास जालना लोकसभा मतदार संघातील महाविकास(इंडिया)आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे यांनी आज सोमवारी येथे बोलतांना व्यक्त केला.जालना लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे यांच्या प्रचारार्थ आज सोमवारी बदनापूर तालुक्यातीलरोषणगाव,बाजार गेवराई बाजार,शेलगाव जिल्हा परिषद गट **पान २ वर**

# रोटरी क्लब ऑफ माजलगावच्या अध्यक्षपदी अँड.रविंद्र कानडे यांची निवड

**माजलगाव लोकनायक वृत्तसेवा –** येथील सामाजिक व सांस्कृतिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या सण २०२४-२५ च्या अध्यक्षपदी ड.रविंद्र कानडे यांची निवड करण्यात आली असून सचिवपदी कवयत्री सौ. लता जोशी व सहाय्यक प्रांतपाल म्हणून डॉ. शंकर जुजगर यांची निवड करण्यात आलेली आहे . लवकरच पदग्रहण सोहळ्याचे आयोजन केले जाणार असून विद्यमान अध्यक्ष रोटेरियन राजेश देशपांडे यांचे कडून ते १ जुलै रोजी पदभार स्वीकारतील.रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ , २०२४-२५ चे गव्हर्नर डॉ. सुरेश साबू यांच्या उपस्थित तीन दिवशीय **पान २ वर**



# जालना लोकसभेसाठी २६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

**जालना लोकनायक वृत्तसेवा –** जालना लोकसभा निवडणूककीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी श्री कृष्ण पांचाळ यांनी पत्रकार परीषदेच्या माध्यमातून माहिती दिली. जालना लोकसभा मतदारसंघासाठी ४७ उमेदवारांनी एकूण ६८ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी १२ उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याने ३५ उमेदवार निवडणूकीच्या



रिंगणात शिल्लक राहिले होते. अर्ज मागे घेण्याचा अखेरच्या दिवशी पर्यंत नऊ ऊमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. यानंतर २६ उमेदवार रिंगणात असून नोंदणीकृत राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पक्षांचे एकूण दहा उमेदवार निवडणुकीसाठी पात्र ठरलेले आहेत तर अपक्ष उमेदवारांची संख्या १६ आहे. चिन्ह वाटपाची प्रक्रिया सुद्धा पार पडली असून नोंदणीकृत राजकीय पक्षांना आरक्षित चिन्ह देण्यात आले असून अपक्ष उमेदवारांना सुद्धा चिन्ह वाटप करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी यावेळी दिली. या निवडणुकीत कल्याण वैजिनाथराव **पान २ वर**







This Newspaper Printed by Owner , Printer , Publisher **Chief Editor BHARAT DEVIDAS GAIKWAD Editor - AKSHAY VISHWAMBHAR MULE** at **Indradhanush Printers and publishers** , Near Post Office , Peth Beed , Khadkpura, Beed 431122 ( Maharashtra ) and Published AT.**The office of Dainik Loknayak** , Near Post Office , Peth Beed , Khadkpura, Beed 431122 ( Maharashtra )

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक **भारत देविदास गायकवाड,**कार्यकारी-संपादक **अक्षय विश्वंभर मुळे** यांनी **इंद्रधनुष्य प्रिंटर्स अॅण्ड पब्लिशर्स**, पोस्ट ऑफीसजवळ, पेठ बीड, खडकपुरा, बीड जि.बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय, पोस्ट ऑफीसजवळ, पेठ बीड, खडकपुरा, बीड जि.बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले.**निवासी संपादिका सौ .अक्षरा अक्षय मुळे. पी.आर.बी.कायद्यानुसार ( सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत)** Mobile: 9850165082 / 9420406019 **E:mail : dainikloknayak@gmail.com**